खंडाळा विभाग शिक्षण समिती संचलित

# सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय खंडाळा

## अर्थशास्त्र विभाग

## सन २०१९ - २०२०

## पोल्ट्री विझिट अहवाल

---

अर्थशास्त्र विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये शनिवार दिनांक २८ सप्टेंबर २०१९ रोजी सकाळी १०.०० ते १.०० या वेळेमध्ये कॉलेज ते संभाजी चौक या मार्गे पोल्ट्री विझिट साठी जाण्यात आले. सुरवातीला कॉलेज मधून जाताना अर्थशात्र विभाग प्रमुख प्रा. मेंढापुरे प्रदीप यांनी विध्यार्थ्यांना पोल्ट्री विषयी थोडक्यात माहिती सांगितली. त्यानंतर प्रा.सावंत शर्मिला आणि प्रा.कोळेकर वैशाली यांनी विद्यार्थ्यांची हजेरी घेतली. १०.३० ला आम्ही सर्वजन पोल्ट्री वर पोचलो.

रामचंद्र सर्जेराव यादव यांचे पोल्ट्री फार्म आहे. त्या ठिकाणी गेल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना तेथील परिसराचे निरीक्षण करण्यास सांगितले. त्यानंतर यादव सर यांनी पोल्ट्री फार्मवर गेल्यानंतर सर्व विध्यार्थ्यांना घेऊन पोल्ट्री फार्मची माहिती सांगितली. त्यामध्ये पोल्ट्रीचीएकूण जागा , पाण्याची सोय , लाईटची सोय, इतर सोई सुविधा तसेच किती जागेत किती कोंबडीची पिल्ले ठेवली जातात. त्या पिल्लांचे खाद्य, औषधे, पाणी व्यवस्था, पिल्लांचा दिनक्रम, पिल्लांची महिन्यात होणारी वाढ, त्यांचे वजन, वातावरणाचा पिल्लांवर होणारा परिणाम इत्यादी गोष्टींची माहिती सांगितली. त्याचबरोबर पोल्ट्रीसाठी एकूण किती भांडवल गुंतवणूक केली, एकूण किती खर्च आहे, व एकूण किती उत्पन्न मिळते या सर्व बाबींची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

सदर पोल्ट्री विझिट साठी अर्थशात्र विभागातील ३ प्राध्यापक व २० विद्यार्थी (मुले व मुली) सहभागी झाले होते.

Susshila Shankarrao Gadhave Mahavidyalay Khandala Tal. Khandala Dist. Satara

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

प्रा.मेंढापुरे.पी.एल

Scanned with OKEN Scanner